MHAU120006332024

**नियमित दिवाणी दावा क्र.– १८८/२०२४**
**अक्षय वाणी वि. राहुल निकम**

## निशाणी–७ खाली आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादींविरुध्द झालेला, दि.३१.०८.२०२४ रोजीचा त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश बाजूस सारुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादींचे असे कथन आहे की, त्यांना प्रकरणतील समन्सची बजावणी एक दिवस अगोदर झाली. या कारणामुळे व त्यांना काही माहिती नसल्याने नेमलेल्या तारखेस न्यायालयात उपस्थित रहाता आले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** वादीने सदर अर्जावर नि.क्र.८ वर म्हणणे दाखल केले आहे. वादींचे असे कथन आहे की, सदरचा अर्ज खोटा व बनावट आहे. अर्जात नमुद केलेले कारण सबळ नाही. अशा परिस्थितीत अर्ज मंजुर करणे उचित होणार नाही. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती वादीने केली.

**०४.** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादीविरुध्द एकतर्फा प्रकरण चालविण्याचा आदेश दि.३१.०८.२०२४ रोजी पारित केलेला आहे. तदनंतर जवळपास पंधरा ते वीस दिवसांनी दि.१९.०९.२०२४ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात नमुद केलेले कारण योग्य नाही. मात्र, लेखी जबाब पटलावर न घेतल्यास दाव्याचा निर्णय गुणांवर होणार नाही. सबब, प्रतिवादीचा लेखी जबाब पटलावर असणे आवश्यक आहे. विलंबाच्या कारणाच्या पृष्टयर्थ कागदपत्र पटलावर नसल्याने, प्रतिवादीला योग्य ती कॉस्ट करणे उचित होईल. सबब,

खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो–

**<u>आदेश</u>**

**०१.** अर्ज रक्कम रुपये ५०/– कॉस्ट वर मंजुर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादींविरुध्द झालेला एकतर्फा आदेश हा बाजुस सारण्यात येतो.

**०३.** सदर कॉस्ट प्रतिवादींनी वादीला दयावी.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2024.10.15 17:37:06 +0530

[आर.एन.पाठक]

**<u>दिनांक</u> : १५.१०.२०२४.**

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
सोयगांव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per original Order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Y. S. Mali |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Soygaon. |
| Date | :- | 15.10.2024 |
| Order signed by presiding Officer on | :- | 15.10.2024 |
| Order uploaded on | :- | 15.10.2024 |